" Sheel, Sharir, Adhyayan "
AundhShikshanMandal, Aundh

*Raja Shripatrao Bhagawantrao Mahavidyalaya,*
*Aundh. (Satara)*

# *Deapartment of Geography*

# VILLAGE SURVEY REPORT

# &

# STUDY TOUR REPORT

# 2021-22

Scanned with CamScanner

Aundh Shikshan Mandal, Aundh's

## *RAJA SHRIPATRAO BHAGAWANTRAO MAHAVIDYALAYA, AUNDH*

*Accredited by NAAC*

## DEPARTMENT OF GEOGRAPHY

# LABORATORY CERTIFICATE

This is to Certify that Shri. / Kum. / Smt. ---कुंभार---
---रणजित आत्माराम---has satisfactorily carried out the required Practical work / Projected work prescribed by

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR**

for the M.A. / ~~M.Sc.~~ part I / II Semester I / II / II / IV course in Geography and this ~~Journal~~ / Report represents his / her bonafide work in the year 2021-2022

Exam Seat No.

Date:-

10/06/2022

Professor In charge

Head
Dept. of Geography
R.S.B. Mahavidyalaya, Aundh.

Head
Department of Geography
Raja Shripatrao Bhagawantrao Mahavidylaya,
Aundh Dist. Satara

17/6

Scanned with CamScanner

" Sheel, Sharir, Adhyayan "
AundhShikshanMandal, Aundh

**Raja Shripatrao Bhagawantrao Mahavidyalaya, Aundh. (Satara)**

# Deapartment of Geography

# VILLAGE SURVEY REPORT

## 2021-22

Students Name:- रणजीत आत्माराम कुंभार

Incharge Teacher:-Prof . Shinde S. M

17/6

Scanned with CamScanner

# प्रकरण १

## -1.1 प्रस्तावना -

भटकंती मनाचा आवडता छंद आहे. या भटकंतीलाच आधुनिक युगातमध्ये पर्यटन असे म्हणतात. मनोरंजन, आनंद, मौज हा पर्यटनाचा मूळ हेतु आहे. पर्यटनामुळे मानवाच्या मानसिक मनोवृत्तीचा विकास होतो. यामुळे सामाजिक बांधलकी जोपासता येते. पर्यटनामुळे आपल्या सामाजिक आर्थिक व सांस्कृतिक देवाण-घेवाण घेण्यास मदत होते. पुर्वीपासुन मानवाला फिरण्याची आवड आहे. पूर्वी वाहतुकीची साधने मर्यादित होती त्यामुळे पर्यटनास मर्यादा होत्या. वाहतुकीच्या साधनात मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. आज मानव आल्हाददायक हवामान, थंड हवेची ठिकाणे, अभयारण्ये राष्ट्रीय उद्याने, ऐतिहासिक ठिकाणे धार्मिक ठिकाणे यांना पर्यटनाच्या दृष्टीने भेटी देता येत आहेत. जगभरातील लोक अशा ठिकाणांना भेटी देवून पर्यटनाचा आनंद लुटतात.

भारत देश हा विविधतेने नटलेला आहे. उदा. पंढरपुर, तुळजापुर, कोल्हापुर अशी धार्मिक स्थळे आहेत. महाराष्ट्रातील सातारा जिल्हातील खटाव तालुक्यातील औंध हे महत्वाचे धार्मीक स्थळ असून याला नैसर्गिक पर्यटन स्थळांची वैशिष्ये लाभली आहेत. या गावाला धार्मीक पर्यटनस्थळाचा दर्जा प्राप्त झाला असला तरी या पर्यटन स्थळाला भेटी देणा-या पर्यटकांची संख्या लक्षात घेतली तर येथे पर्यटनस्थळांचा विकास करण्यासाठी मोठा वाव दिसुन येतो.

## 1.2 औंध गावाची निवड -

औंध हे ऐतिहासिक गाव पर्यटनांच्या दृष्टीने प्रसिद्ध आहे. महाराष्ट्रात कर्नाटक राज्यातून येथे पर्यटक येतात. श्री. यमाई देवी हे येथील कुलदैवत आहे भौगोलिक दृष्टया हे गाव महादेव डोंगर रांगेत .वसलेले आहे. स्वातंत्र्यापूर्वी औंध हे संस्थान होते. येथील जुना राजवाडा, श्री यमाई देवीचे मंदिर, श्री. भवानी वस्तुचित्र

Scanned with CamScanner

संग्रालय, नागाळे, पदमाळे हे तळे उंच दिपस्तंभ या वस्तु पर्यटकांना आकर्षित करतात. औंध येथे आठवडी बाजार, पोलिस स्टेशन, शासकिय व खाजगी दवाखाने, तसेच शैक्षणिक सुविधा, सोयीमुळे हे महत्वाचे वाटले. शिवाय या गावात शेती व्यवसाया बरोबरच, पशुपालन, रंगकाम, खाजगी व सरकारी नोकरी करणारे लोक आहेत. त्या अनुशंगाने औंध या पर्यटन केंद्राचा अभ्यास करण्यासाठी सातारा जिल्हातील या ऐतिहासिक गावाची निवड केली.

## 1.3 औंध गावाची भौगोलिक माहिती-

महाराष्ट्र राज्यातील सातारा जिल्हाच्या पुर्वेला सातार पासून 40 कि.मी.लांबीवर औंध हे जुने संस्थान आहे. औंधचा अक्षवृत्तीय विस्तार 17°,33',20" उत्तर 74°,33',26" पूर्व रेखावृत्त आहे. समुद्र सपाटीपासुन या गावाची उंची 800 मीटर आढळून येते. औंधच्या पुर्वेला गोसाव्याची वाडी, आग्नेयेस खरशिंगे, दक्षिणेस करांडेवाडी व येळीव तर पश्चिमेस नांदोशी खबालवाडी, याबरोबरच उत्तरेस जायगांव व ईशान्येस वरुड या गावाच्या सिमा लागतात. औंधच्या उत्तर व पश्चिम भागात महादेव डोंगर रांगाच्या उपशाखा आढळून येतात.

दख्यनच्या पठारावर पश्चिम घाटाच्या पुर्वेस औंध सपाट माथ्याचे पठार आहे. येथील जमीन कोरडवाहु असुन येथील पिकांमध्ये विविधता आढळून येते. येथील शेती पुर्णपणे मान्सुनवर अवलंबुन आहे. औंध मधून नांदणी नदीचा उगम होतो. मात्र या ठिकाणी नदीचे पान अतिशय अरुंद असून यामध्ये कोणतीही भुमी स्वरुपे आढळत नाहीत. नांदणी नदी ही येरळा नदीची एक उपनदी आहे. औंधचे हवामान विषम स्वरुपाचे आढळून येते. यामुळे येथे सर्वत्र विविधता आढळून येते. उदा. पीके व्यवसाय, निवारा.

Scanned with CamScanner

## 1.4 उद्देश

1 औंध पर्यटन स्थळांविषयी माहिती उपलब्ध करणे.

2 औंध पर्यटनाच्या दृष्टीने औंधच्या सद्यस्थितीचा अभ्यास करणे.

3 औंध पर्यटन स्थळाच्या समस्या व उपायांविषयी माहिती मिळविणे.

## 1.5 अभ्यासपद्धती -

1 प्रस्तुत अभ्यास प्राथमिक माहितीवर आधारलेला आहे.

2 माहिती संकलनासाठी मुलाखत प्रश्नावली इत्यादी पद्धतीचा अवलंब केला आहे.

3 इतर आवश्यक माहिती घेण्यायाठी (क्षेत्रीय नकाशे) व इतर अनुसांधिक पुस्तके यातुन मिळवीली.

4 उपलब्ध माहितीवर योग्य संकरण करून या माहितीचे विश्लेषण करणे.

Scanned with CamScanner

प्रकरण 2

औंध पर्यटनात्मक विकास

2.1 ऐतिहासिक पार्श्वभूमी

2.2 धार्मिक पार्श्वभूमी

2.3 सांस्कृतिक पार्श्वभूमी

2.1 ऐतिहासिक पार्श्वभूमी-

औंध या गावास खुप मोठा ऐतिहासिक वारसा लाभला आहे. एका अभ्यासकेनुसार किंवा कथेनुसार औंध येथे घनदाट अरण्य होते. त्यात औंधासुर नावाचा राक्षस राहत होता. या राक्षसाच्या नावावरुन या गावास औंध नाव पडले.

न्यायप्रेमी व्यायामप्रेमी, कलाप्रेमी, शिक्षणप्रेमी, पुरोगामी, असे मुलखावेगळे औंध संस्थान होते. गांधीवादी घटनेचा प्रयोग भारतात सर्वप्रथम औंध संस्थानात 23 नोव्हेंबर 1938 रोजा सुरु झाला. हा राज्य व्यवस्थेचा प्रयोग औंध एसमी प्रेट म्हणून प्रसिद्ध आहे. 21 जानेवारी 1939 रोजी ग्राम स्वराज्य शासन पद्धती निर्माण करणारी नवीन राज्यघटना आमलात आणली गेली. पंडीत नेहरू, विजयालक्ष्मी पंडीत यांनी औंध येथील श्री यमाई मंदिर तसेच श्री यमाई श्रीनिवास विद्‌यालयास भेट दिली. प्रती सरकारचा जन्म म्हणजे औंध संस्थानांनी तयार केलेली ग्रामस्वराज्याची कल्पना होय.

1942 च्या भारत छोड़ो क्रांती लढ्यात औंध संस्थानचा सहभाग होता. औंधचा शरीर संवर्धनासाठी 'सुर्यनमस्कार' हा व्यायाम प्रकार सुप्रसिद्ध आहे. याशिवाय औंध येथे 1940 पासून शिवानंद स्वामीच्या स्मृतीप्रित्यर्थ संगीत

Scanned with CamScanner

महोत्सव सुरु केला आहे. हा महोत्सव औंध संगीत महोत्सव या नावाने दरवर्षी औंध मध्ये साजरा होतो.

निस्पृश्य पद्धतीने नाव लौकिक मिळावलेले औंधचे बाळासाहेब पंतप्रतिनिधी सन 1835 मध्ये इंदुर येथील 21 व्या अखील भारतीय मराठी साहित्य सम्मेलनाचे अध्यक्ष होते. स्वयंम रोजगार आणि औद्योगिकीकरनाचा पाया लाभलेल्या औंध नगरीतून किर्लोस्कर, ओगले या उद्योग समूहाची पायाभरणी झाली. स्वातंत्र्य, समता, बंधुता हाच पाया असणाऱ्या औंध संस्थानात खऱ्या अर्थाने लोकराज्य होते. म्हणजे लोकशाहीचा पाया औंध संस्थानातूनच घातला गेला. या ऐतिहासिक वारसा बरोबरच औंध येथील पुराण वस्तु संग्रहालय व भव्य ग्रंथालय इतिहासाची ओळख करून देते. आज येथील हे वस्तुसंग्रहालय हिरव्यागार वनराईने नटलेले दिसते.

## 2.2 धार्मिक पार्श्वभूमी-

औंध या गावास धार्मीक दृष्ट्या देखील महत्वाचे स्थान आहे. येथील धार्मीक हेतुनेच भारतीय संस्कृती दिसुन येते. येथे प्राचीन काळापासून वेगवेगळे सण, उत्सव साजरे केले जातात. सभोवतालच्या पठारावर सपाट मैदानात असलेले मुळपीठनिवासिनी श्री. यमाईदेवी महाराष्ट्रातीलच नव्हे तर कर्नाटक राज्यातील सुद्धा भक्तीच्या आकर्षणाचे व श्रद्धेचे स्थान आहे. देवळाच्या गाभा-यात देवीचे स्वयंभू स्थान असुन देवीची दगडात कोरलेली मुर्ती आहे. औंधनगरीत प्रतिवर्षी शाकंभरी पोर्णिमेला देवीची मोठी यात्रा भरते. याशिवाय नवरात्र उत्सव मोठ्या प्रमाणात पार पाडला जातो. या धार्मिक गोष्टी बरोबरच दत्त जयंती, महाशिवरात्री, राम नवमी, हे उत्सव देखील मोठ्या धार्मीक भावनेने पार पाडले जातात. शिवाय औंध मध्ये अनेक प्राचीन मंदिर असल्याने औंधचा धार्मिक वारसा मोठा आहे.

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

# प्रकरण ३

## औंध मधील पर्यटकांची आकर्षण ठिकाणे-

### ३.१ मूळपीठ देवी श्री यमाई मंदीर-

औंध पर्यटन स्थळाच्या आकर्षण ठिकाणामध्ये मुळपीठ देवी श्री यमाई मंदीर एक वैशिष्टेपूर्ण असलेले आढळते. श्री यमाई देवी ही महाराष्ट्र तसेच कर्नाटक राज्यातील अनेक लोकांचे कुलदैवत आहे. शिवाय आकर्षणाचे व श्रध्देचे ठिकाण आहे. देवळाच्या मुख्य गाभा-यात देवीचे स्वयंभूस्थान असून त्याच्या पाठीमागे देवीची दगडात कोरलेली मूर्ती आहे. या देवीची प्रभावळ चांदीची आहे. या देवळाचा गाभारा चाणक्य काळातील असून तो इ.स.८०० ते ९०० काळातील असावा. या मंदीराच्या चारही बाजूनी दगडी तट बांधलेला आहे. या तटामध्ये पुजा-यांच्या निवासासाठी तीन खोल्या आहेत. या तटात उत्तरेला व दक्षिणेला परिसद्वार आहे. व पहारेकरी कमानी आहेत. प्रांगणात एक दिपमाळ व नंदीची मूर्ती आहे. मंदीराकडे येण्यासाठी पायथ्यापासून रस्त्यापर्यंत जवळ जवळ ४३८ पायऱ्या आहेत. मंदिरापर्यंत येण्यासाठी डांबरी पक्का रस्ता असलेला दिसून येतो. यमाई देवी ही साडेतीन पिठापैकी एक पीठ आहे.

### ३.२ श्री अंबाबाई मंदिर-

औंध गावची शान वाढवणारी आणि भक्तांची श्रद्धास्थान असणारी श्री अंबाबाई जगदंबा मंदिर अत्यंत प्रेक्षणीय आहे. येथील देवीची मुर्ती सोन्याची असून तीच्या अंगावरील दागिने पर्यटकांचे खास आकर्षण आहे. मंदिरापुढील सभामंडप अत्यंत प्रशस्त असून या सभामंडपात श्री बाळासाहेब यांनी स्वतः अनेक पुराणातील प्रसंग चित्रीत केले आहेत. पर्यटकांचे व भक्तांचे ते एक मुख्य आकर्षण आहे.

Scanned with CamScanner



श्री भवानी चित्र संग्रहालय याची पाहणी करताना विद्यार्थी.



मूळपीठ निवासिनी श्री यमाई देवी मंदीर, औंध.

Scanned with CamScanner

सभामंडपाच्या बाहेर लक्ष वेधीत होणारी उंच एक दिपमाळ उभी आहे. अंबाबाई मंदिर १८८२ ते १९०१ या काळात श्री परशूराम पंतप्रतिनीधी यांनी ९४००० रूपये खर्च करून बांधले. इ.स. १९०१ या काळात श्री श्रीमंत परशुराम पंतप्रतिनीधी यांनी मंदिरापुढील सभामंडप बांधण्यास प्रारंभ केला. त्यांच्या मृत्युनंतर श्रीमंत बाळासाहेब महाराजांनी सन १९१० मध्ये ६५००० रूपये खर्च करून सभामंडपाचे कामकाज पूर्ण केले.

३.३ राजवाडा-

औंधच्या राजाचा राजवाडा अजूनही दिमाखात उभा असलेला आपणास दिसून येतो. हा राजवाडा अंबाबाई मंदिराच्या दक्षिण बाजूस असून पर्यटकांचे खास आकर्षण असलेला दिसून येतो.

औंध संस्थानची ओळख अजून जगाला सांगणारा हा वाडा अत्यंत प्रेक्षणीय आहे. या राजवाडयाच्या आग्नेय दिशेला कराड देवीचे मंदिर आहे. येथील अजंठा हॉल अजून ही इतिहासाची साक्ष देतो.

३.४ दत्त मंदिर

मूळपीठ डोंगराच्या पायथ्याला रस्त्याच्या डाव्या बाजूला श्रीमंत परमहंस श्री शिवानंद महाराज यांच्या स्मरणार्थ अनंत मनोहर जोशी बुवा यांनी शके १८६२ इ.स. १९४० मध्ये हे मंदिर बांधले.

३.५ श्री राम मंदिर

औंध येथील पंचवटी येथे श्रीमंत श्रीनिवास महाराजांची समाधी आहे .हि समाधी गावका-यांचे श्रध्दास्थान आहे. या समाधीच्या दक्षिण बाजूला श्रीरामाचे मंदिर आहे. हे मंदिर श्रीनिवास महाराजांनी स्वखर्चाने बांधले आहे.


Scanned with CamScanner



श्री यमाई देवी मंदिराची माहिती विद्यार्थ्यांना देताना प्रा.एस.एम.शिंदे सर.



श्री अंबाबाई मंदिर आणि महाराष्ट्रातील सर्वात उंच दीपमाळ, औंध.



नागाळे तळे, औंध.

Scanned with CamScanner

### ३.९ इतर आकर्षण ठिकाणे

1. औंधेश्वर मंदिर
2. विठ्ठल रुक्मीणी मंदिर
3. विष्णू-लक्ष्मी मंदिर
4. हरिहरेश्वर मंदिर
5. राधा कृष्ण मंदिर

### ३.१० पवन उर्जा प्रकल्प

औंध या गावाच्या सौंदर्यात भर म्हणून औंध येथील पवनचक्क्यांचा उल्लेख केला जातो. सन २००७-०८ २००८-०९ या १-२ वर्षामध्ये जवळ जवळ १५० च्या वर येथील मावशीच्या डोंगर, जोतीबा व गोसाव्याचीवाडी डोंगरावर पवनचक्क्या उभारल्या आहेत. त्यामूळे हे सौंदर्य देखील येथील पर्यटनाचे एक आकर्षण ठरले आहे.

Scanned with CamScanner

## प्रकरण ४

### औंध धार्मिक पर्यटन स्थळाच्या समस्या

औंध या धार्मिक पर्यटन स्थळाचा अभ्यास केला असता येथे पर्यटनाचा अधिक अधिक विकास होत असला तरी येथे अनेक समस्या आढळून येतात.

1. वाहतूक साधनांची कमतरता आहे शिवाय पकाया रस्त्याची गैरसोय /कमतरता
i. आहे.
2. राहण्याची लॉजीग बोर्डिंगची कमतरता आहे.
3. येथे पर्यटकांना मार्गदर्शन करणा-या गाईडची सुविधा नाही.
4. पाणी पुरवठा कमी प्रमाणात उपलब्ध आहे.
5. मूळपीठ मंदिराजवळ स्वच्छता गृहाची कमतरता आहे.
6. ग्राहकांना आकर्षण करणारी अशी दुकाने येथे नाहीत.
7. भोजन गृहांची मोठया प्रमाणात गैरसोय आहे.
8. पर्यटकांना करमणूकीची साधने कमी आहेत.
9. मूळपीठ डोंगर चढून वरती जाने काही पर्यटकांना अवघड असते तेव्हा रोप वे ची कमतरता आहे.
10. पर्यटकांच्या अधिक आकर्षणासाठी येथे बाग बगिचा शिवाय पोहण्याचा तलाव, बोटिंग असणे आवश्यक आहे.

Scanned with CamScanner

## समस्यावरील उपाय योजना

१. पर्यटनाविषयी माहिती

या परिसरातील लोकांना पर्यटना विषयी माहिती देने आवश्यक आहे. पर्यटनाच्या माध्यमातून आपला विकास कसा पडतो यांची लोकांना माहिती दिली तर पर्यटनाला चालना मिळू शकेल.

२. पक्क्या रस्त्यांची सुविधा

येथे मुख्य समस्या म्हणजे पक्या रस्त्यांची कमरतरता होय. या साठी येथे पक्के रस्ते आवश्यक आहेत. सातारा, वडूज, कराड, विटा या शहरापासून औंध पर्यटन ठिकाणापर्यंत वाहतूक सुविधा अधिक चांगली असली तर पर्यटनाचा विकास अधिक घडू शकेल.

३. निवास सुविधांची उपलब्धता

औंध येथे निवासाच्या सुविधा उपलब्ध नाहीत. येथे चांगल्या प्रकारच्या भक्ती निवासाची /लॉजीगची सुविधा निर्माण केल्या तर भाविक /पर्यटक अशा ठिकाणाला मोठया संख्येने भेटी देतील

४. उपहारगृहे येथे कायम स्वरूपी स्वस्त व उत्तम उपहार गृहे असणे आवश्यक आहे.

५. वाहतूक व्यवस्था

मूळपीठ देवी व संग्रहालय या ठिकाणी जाण्यासाठी एस.टी. च्या सुविधा उपलब्ध नाहीत. त्यामूळे मुख्य रस्त्यापासून १ ते २ कि.मी. स्वतःच्या किंवा खाजगी वाहणाने तसेच पायी जावे लागते. जर येथे जाण्यासाठी वाहतुकीची सुविधा उपलब्ध करून दिली तर पर्यटनाला अधिक चालना मिळेल.

Scanned with CamScanner

## निष्कर्ष

औंध या धार्मिक पर्यटन स्थळाचा अभ्यास केला असता येथे येणाऱ्या पर्यटकाच्या संख्येच्या आधारावर पर्यटनाचा अधिक अधिक विकास होत आहे. येथील मुळपीठ यमाई मंदिर, अंबाबाई मंदिर व वस्तूचित्र संग्रहालय यामुळे येथे पर्यटक मोठ्या संख्येने येत आहेत. शैक्षणिक सहली सुध्दा मोठ्या प्रमाणात येथे येत असतात. काही महत्त्वाच्या गैरसोईची पूर्तता केल्यास औंध धार्मिक पर्यटन स्थळाचा अधिक विकास होण्यास मदत होईल व येथील लोकांना रोजगार उपलब्ध होवून आर्थिकदृष्ट्या विकसित होण्यास मदत होईल.

मुळपीठ निवासिनी कोण श्री यमाई देवी व श्री भवानी वस्तू चित्र संग्रहालय यांचा विस्तार व विकास हेच या धार्मिक ठिकाणाच्या पर्यटन विकासाचे माध्यम / मुख्य आधार होय.

Scanned with CamScanner

# प्रश्नावली

१. पर्यटकाचे नाव ------------------------------

शिक्षण ------------------------------

पत्ता ------------------------------

व्यवसाय ------------------------------

२. पर्यटनास कोणत्या वाहनानी आला

अ. सरकारी  ब. खाजगी  क.स्वतःच्या मालकीच्या

३. औंध धार्मिक पर्यटन स्थळी आवडलेली ठिकाणे

------------------------------------------------

४. धार्मिक पर्यटन स्थळी कोणत्या गैरसोयी आढळल्या?

------------------------------------------------

------------------------------------------------

------------------------------------------------

५. धार्मिक पर्यटनाचा विकास होण्यासाठी कोणत्या सोईची आवश्यकता आहे?

------------------------------------------------

------------------------------------------------

६. औंध धार्मिक पर्यटन स्थळाविषयी आपले मत ?

------------------------------------------------

------------------------------------------------

Scanned with CamScanner

*" Sheel, Sharir, Adhyayan "*
*AundhShikshanMandal, Aundh*

***Raja Shripatrao Bhagawantrao Mahavidyalaya,***
***Aundh. (Satara)***

# *Deapartment of Geography*

# STUDY TOUR REPORT

## 2021-22

*Students Name:- रणजीत आत्माराम कुंभार .*

*Incharge Teacher:-Prof . Shinde S. M*

Scanned with CamScanner

Dept. of Geography Aundh R.S.B. Mahavidyalaya, Aundh

# RAJA SHRIPATRAO BHAGAWANTRAO MAHAVIDYLAYA, AUNDH Tal Khatav, Dist. Satara

## Department of Geography

## B.A. - 2021-22

| Geography | |
|---|---|
| 66 | Amale Suraj Nana |
| 67 | Chavan Sushant Shashikant |
| 68 | * Gharge Rutuja Balasaheb |
| 69 | * Ingale Nisha Vijay |
| 70 | Jadhav Rohan Hanmant |
| 71 | * Jadhav Ankita Vishnu |
| 72 | * Jathar Pradnya Bharat |
| 73 | * Jadhav Rajashri Rajendra |
| 74 | * Jadhav Sadhana Shrimant |
| 75 | * Jadhav Pooja Uddhav |
| 76 | * Jadhav Rutuja Balso |
| 77 | Kshirsagar Nilesh Santosh |
| 78 | Mulani Dilawar Lala |
| 79 | Mali Omkar Dadasaheb |
| 80 | Nanaware Chaitanya Jivan |
| 81 | Phadtare Ramesh Pandurang |
| 82 | * Patil Prajakta Ashok |
| 83 | Randive Mohit Shankar |
| 84 | * Randive Anjali Ramesh |
| 85 | Sathe Abhishek Dattatray |
| 86 | * Yadav Swapnali Dattatray |
| 87 | * Yewale Chaitanya Vitthal |

(Prof. Shinde S.M.)

Head
Dept. of Geography
R.S.B. Mahavidyalaya Aundh.

Scanned with CamScanner

# - ऋणनिर्देश-

शिवाजी विद्यापीठाच्या अभ्यासक्रमानुसार बी.ए.भाग III या भूगोल विषयाच्या पेपर क्रमांक XIV शैक्षणिक सहल हा अभ्यास आहे. या अभ्यास विषयाला अनुसरून 2021-22 या शैक्षणिक वर्षात आमची सहल औंध ते पुणे या ठिकाणी आयोजित केली होती. दिनांक 11/05/2022 रोजी आमची शैक्षणिक सहल पूर्ण करण्यास अनेक व्यक्तींचे सहकार्य लाभले. त्यात महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सावंत मॅडम तसेच भूगोल शास्त्र विभाग प्रमुख डॉ. बरकडे.जे.डी यांनी परवानगी दिली व मार्गदर्शन केले याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. याशिवाय भूगोल विभागातील प्राध्यापक शिंदे.एस.एम तसेच प्राध्यापक मुल्ला सर यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले व माहिती दिली त्याबद्दल त्यांचेही आभार. तसेच ज्या बस मधून आम्ही प्रवास केला त्या बसचे चालक मालक तसेच आई-वडील ज्यांनी सहलीस जाण्यास मदत केली त्याबद्दल या सर्वांचा मी ऋणी आहे.

Scanned with CamScanner

## भूगोल अभ्यासातील सहलीचे महत्त्व

भूगोल विषयाचा अभ्यास प्राचीन काळापासून केला जातो. जसजसा मानवाचा विकास होत गेला तस तसा भूगोलाच्या अभ्यास पद्धती अभ्यास विषय यांच्यात बदल होत गेला. या बदलत्या काळानुसार भूगोलाचे स्वरूप व व्याप्तीही बदलत गेली. पृथ्वीवरील निसर्ग आणि मानव यांच्यातील संबंध संकीर्ण स्वरूपाचे आहेत. मानवाने विविध माध्यमांच्या सहाय्याने पर्यावरणीय गुढे उकरून काढली आहेत. या दृष्टिकोनातूनच भूगोल शास्त्राच्या अभ्यासामध्ये शैक्षणिक सहली या समावेश करण्यात आला आहे.

भूगोल विषयाचा अभ्यास करत असताना नैसर्गिक व सांस्कृतिक पर्यावरणातील विविध घटकांचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष निरीक्षण केले जाते. चार भिंतीच्या आत अभ्यास करणे हा भूगोल विषयाचा उद्देश नाही. पर्यावरणाच्या सहवासात राहिल्यास पर्यावरण विषयक अधिक सखोल माहिती मिळते. तर त्यासाठी प्रत्यक्ष निरीक्षण व सहवास करणे आवश्यक असते.

भूगोल शास्त्राच्या व्याख्येनुसार भूगोलाचा अभ्यास करण्यासाठी सहली सारखे दुसरे माध्यम नाही. म्हणून पूर्वीपासून हंम्बोल्ट, कार्ल रिटर, विदाल-दा-ब्लास, डेव्हीस इत्यादी भूगोल शास्त्रज्ञांनी जगाचा प्रदीर्घ प्रवास व अभ्यास करून निरीक्षणाच्या माध्यमातून भूगोलाच्या अभ्यासात मोलाची भर घातली आहे. सहली विविध कारणांनी अतिशय महत्त्वाच्या असून व्यक्तीला अनुभवातून शिकण्यास मदत करतात तसेच व्यक्तीच्या व्यक्तिमत्व विकासात महत्त्वाची भूमिका बजावतात. शैक्षणिक सहलींच्या माध्यमातून करिअरची ही निवड करता येते.

Scanned with CamScanner

सहलीचे शोहनयात महत्त्व पुढीलप्रमाणे सांगता येईल-

i) सहलींमुळेच नवनवीन ठिकाणांना भेटी दिल्यामुळे नवनव्या गोष्टी शिकण्यास मदत होते.

ii) सहली मुळे विद्यार्थ्यांना नवीन वातावरणात घेऊन जाऊन त्यांना समूहात प्रवास करण्याचा अनुभव येतो आणि त्यांना भेट देणाऱ्या स्थळांचा पर्यावरणाचा आदर करण्यास शिकविले जातील.

iii) सहलीचे महत्त्व विद्यार्थ्यांना त्यांच्या वर्ग सोबत यांसोबत जवळचे संबंध तयार करण्याची संधी, नवीन वातावरणाचा अनुभव, जीवनातील एकसुरीपणा दूर करणे आणि वर्गापासून दूर राहण्याचा आनंद मिळतो.


iv) अनौपचारिक शिक्षण, जीवनसंघर्ष, पर्यावरण याबद्दलची माहिती मिळते.

v) गौरवशाली, ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसास्थळे याबद्दलची माहिती मिळते.

vi) सहलीमुळे विद्यार्थ्यांना ज्ञान सुधारण्यासाठी प्रोत्साहन मिळते.

vii) सहलींमुळे विद्यार्थ्यांना विविध प्रदेशाचे वैशिष्ट्यपूर्ण यथार्थ चित्रण पहावयास मिळते. त्यातून त्यांची निरीक्षण शक्ती वाढते.

Scanned with CamScanner




Scanned with CamScanner

## सहलीचा उद्देश/ हेतू :-

i) मनोरंजन, करमणूक व मनःशांती होते.

ii) निसर्ग पर्यटन होते.

iii) आरोग्याच्या दृष्टीने निसर्गोपचार केंद्रांना भेटी देता येतात.

iv) अभ्यास करण्याच्या हेतूने सहलीमध्ये सहभागी होता येते.

v) ऐतिहासिक, शैक्षणिक, धार्मिक व सांस्कृतिक स्थळांविषयी माहिती मिळवता येते.

Scanned with CamScanner

## सहल मार्गातील भौगोलिक, सांस्कृतिक घटकांमधील बदल वैशिष्ट्ये:-

कोणत्याही भागाचा अभ्यास करताना त्यामध्ये अनेक बाबतीत भिन्नता आढळून येते. त्यामध्ये भूरचना, हवामान, जमीन, वनस्पती, लोकजीवन, मानवी व्यवसाय आणि मानवीवसाहती यांचा समावेश होतो.

1) भू-रचना:-

औंध ते पुणे या भागाचा अभ्यास करताना भु-रचनेमध्ये बरीचशी तफावत आढळते.वास्तविक पाहता दख्खनच्या पठाराचा हा भाग असून यामध्ये सह्याद्री पर्वताला पूर्व-पश्चिम दिशेमध्ये पसरलेल्या अनेक डोंगररांग आढळतात. या डोंगररांगांचे एक वैशिष्ट्य त्या एकमेकांना पूर्व पश्चिम दिशेत समांतर पसरलेल्या आहेत.

i) महादेव डोंगररांग (औंध ते पुणे).

ii) हरिश्चंद्र- बालाघाट डोंगररांग (पुणे ते अहमदनगर).

iii) सातमाळ-अजिंठा डोंगररांग (अहमदनगर ते नाशिक).

या डोंगररांगांतून असणारे घाट उदा. कात्रज घाट. अशा या डोंगररचनेतून प्रवास करताना त्यातून दिसणारे सृष्टी सौंदर्य खरोखरच मानवी मनाला विरंगुळा व समाधान देते. डोंगररांगांतून अधूनमधून येणारे उंच उंच शिखरे त्यांचा आकार, उतारांचे विविध प्रकार यांचे निरीक्षण केले असता बाह्यकारकांचा होणारा परिणाम चटकन लक्षात येतो.

Scanned with CamScanner

2) हवामान:-

औंध ते पुणे येथील हवामानाचा अभ्यास करता हवामानामध्ये शक्यतो विविधता आढळून येत नाही. हे भाग समुद्रापासून दूर असल्यामुळे येथील हवामान विषम स्वरूपाची आढळून येते. मात्र जवळच महाबळेश्वर सारख्या ठिकाणी थंड हवामान आढळून येते. कारण महाबळेश्वरची समुद्रसपाटीपासूनची उंची जास्त असल्यामुळे येथे हवामानात झालेला बदल दिसून येतो. एकंदरीत औंध ते पुणे प्रवास मार्गात हवामानात कोणताही बदल आढळून येत नाही.

3) वनस्पती:-

विविध घटकांच्या बदलासंदर्भात अभ्यास करताना नैसर्गिक वनस्पतींची वाढ व वितरण हे प्रामुख्याने प्राकृतिक रचना व हवामान या घटकांवर अवलंबून असते. औंध ते पुणे हा भाग तसा पर्जन्यछायेतच येतो. येथे सरासरी पाऊस २५°c एवढा पडतो. त्यामुळे येथे पानझडी वृक्ष मोठ्या प्रमाणात आढळून येतात. तसेच खुरट्या वनस्पती ही आढळून येतात. आंबा, चिंच, वड यासारखेच वृक्ष येथे आढळून येतात. उन्हाळ्यात या झाडांची पाने जोडून जातात. परंतु आमची शैक्षणिक सहल ऐन उन्हाळ्यातच असल्यामुळे वनस्पती मोठ्या प्रमाणात हिरव्यागार आढळून येत नाहीत. पण तरीसुद्धा निसर्गातील चमत्कार म्हणून चैत्र महिन्या नंतर झाडाला पालवी फुटते. त्यामुळे ऐन उन्हाळ्यात सुद्धा काही वनस्पती हिरव्यागार आढळून येत होत्या.

Scanned with CamScanner

4) जमीन किंवा मृदा:-

वास्तविक पाहता हा भाग दख्खनच्या पठाराचा असल्याने तसेच औंधचा पठार म्हणून ओळखला जात असल्याने येथील जमीन रेगुर प्रकारची आढळून येते. काही ठिकाणी नदीलगतचा प्रदेश काळ्या कसदार जमिनीचा दिसून येतो तर काही भागांमध्ये खडकाळ, मुरमाड जमीन आढळून येते .

5) प्राणीजीवन:-

मानवी जीवनाबरोबरच प्राणी जीवनावर ही प्राकृतिक घटकांचा परिणाम मोठ्या प्रमाणावर झालेला आपणास दिसून येतो. वास्तविक पाहता हा भाग कमी पर्जन्याचा असल्याने येथे वीर वनस्पती आढळतात. म्हणजेच हा भाग जंगलव्याप्त विरहित असल्याने येथे पाळीव प्राण्यां शिवाय लांडगे, कोल्हे यांसारखेच रानटी प्राणी येथे आढळून येतात. शिवाय रान डुक्कर यांसारखे ही प्राणी या प्रदेशात आढळतात.

6) मानवी व्यवसाय:-

भौगोलिक घटकांचा परिणाम हा प्रामुख्याने व्यवसायावर मोठ्या प्रमाणात झालेला दिसून येतो. औंध ते पुणे या भागाचा अभ्यास केला असता प्रामुख्याने या ठिकाणी शेती हा व्यवसाय आढळून येतो. नीरा-भीमा आणि कृष्णा  नद्या खोऱ्यांचा हा प्रदेश असल्याने येथे शेतीचा विकास मोठ्या प्रमाणात झालेला दिसून येतो. त्यामुळे या परिसरात शेती व्यवसायाबरोबर शेतीव्यवसायाला पूरक असे पशूपालन, दुकानदारी शिवाय द्वितीय आणि

Scanned with CamScanner

तृतीय व्यवसाय विकसित झालेले दिसून येतात. सातारा पुणे शहरालगत एम आय डी सी असल्यामुळे येथे अनेक उद्योगांचा विकास झालेला दिसून येतो. शेती सारखे व्यवसायातून ऊस, कापुस, कांदा, बटाटा यासारखी रोखीचे पीक मोठ्या प्रमाणात घेतली जातात. एकंदरीत या प्रदेशांमध्ये लहान-मोठे व्यवसाय यांचा विकास झालेला दिसून येतो.

7) मानवी वस्ती:-

आजचे युग वैज्ञानिक युग म्हणून ओळखले जाते. या वैज्ञानिक युगामध्ये विज्ञान व तंत्रज्ञानाचा विकास मोठ्या प्रमाणात झालेला आहे. सिमेंट कॉक्रीटच्या या दुनियेत आपल्याला सध्या सिमेंट कॉक्रिटचे घरी जास्त आढळून येतात. अलीकडे झोपडपट्टी कौलारू घरे कमी आढळून येतात. सातारा पुणे या सारखे नागरीकरण झालेल्या शहरात मात्र नागरी वस्ती दाट आढळून येते. मात्र इतर ठिकाणी आपणास विखुरलेल्या वसाहती आढळून येतात. अगदी डोंगरा लगतचा भाग विरळ लोकवस्तीचा आढळून येतो. मात्र त्यांच्या लगतच्या प्रदेशामध्ये शेतीचा विकास झाल्याने मानवी वस्ती स्थान दाट आढळून येत असल्याने रहिमतपूर,शिरवळ यांसारखी शहरे विकसित झालेले आढळून येतात.

पर्यावरण व मानवी जीवन यांच्यातील सहसंबंध स्पष्टपणे दिसून येतो. भूरचना, हवामान यांना अनुसरूनच मानवी वस्ती स्थान, उद्योगधंदे, दळणवळणसुविधांचा विकास झालेला दिसून येतो. एकंदरीत पर्यावरण व मानवी जीवन यांच्यातील सहसंबंध चटकन लक्षात येतो

Scanned with CamScanner

## सहल मार्गातील प्रेक्षणीय स्थळे:-

1) प्रती बालाजी (केटकवले, पुरंदर):-


आंध्र प्रदेशातील प्रसिद्ध तिरुपती बालाजी मंदिराचे प्रतिरूप मंदिर म्हणून पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील केटकवले या गावातील प्रती बालाजी हे मंदिर खूप प्रसिद्ध आहे. धार्मिक दृष्टीने या मंदिराला अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यामुळे धार्मिक दृष्टीकोनातून दरवर्षी हजारो पर्यटक येथे भेटी देतात. भारतातील अनेक श्रीमंत मंदिरांपैकी हे एक मंदिर आहे. येथील वातावरण अतिशय शांत व धार्मिक स्वरूपाचे आढळून येते.

2) सिंहगड किल्ला:-


सिंहगड हा भारताच्या महाराष्ट्र राज्यातील पुणे जिल्ह्यातील एक किल्ला आहे.पुण्याच्या नैर्ऋत्येला साधारण २५ किमी अंतरावर असणारा हा किल्ला समुद्रसपाटीपासून सुमारे ४४०० फूट उंच आहे. सह्याद्रीच्या पूर्व शाखेवर पसरलेल्या सुलेश्वराच्या रांगेवर हा गड आहे. दोन पायऱ्यासारखा दिसणारा खंदकाचा आग आणि दूरदर्शनचा उभारलेला मनोरा यामुळे पुण्यातून कुठूनही तो लक्ष वेधतो पुरंदर, राजगड, तोरणा, लोहगड, विसापूर, तुंग असा प्रचंड मुलुख या गडावरून दिसतो.

सिंहगड या किल्ल्याचे आधीचे नाव कोंढाणा होते. स्थानिक महादेव कोळी लोकांच्या आख्यायिकेनुसार कौडण्यऋषी यांनी येथे तपश्चर्या केली म्हणून या डोंगराचे नाव कोंढाणा झाले. हा किल्ला पूर्वी पासून कोळी लोकांच्या ताब्यात होता.

Scanned with CamScanner



प्रती बालाजी मंदिर, पुणे.



भू-रचनेविषयी विद्यार्थ्यांना माहिती देताना प्राध्यापक एस.एम.शिंदे सर.

(सिंहगड किल्ला)

Scanned with CamScanner

3) राजीव गांधी प्राणी संग्रहालय, कात्रज:-

कात्रज सर्प उद्यान हे पुण्यात भारती विद्यापीठ जवळ पुणे सातारा महामार्ग वर कात्रज येथे वसलेले आहे. इ.स.१९८६ मध्ये जीलम कुमार खैरे यांनी ते वसविले. ते सर्पोद्यानाचे पहिले संचालक होते. सर्व जातींचे सर्प, सरपटणारे प्राणी आणि प्राणिजगतातल्या अनेक जीवांना येथे संरक्षण देऊन त्यांचे जतन व संवर्धन केले जाते इ.स. १९९९ मध्ये या सर्पोद्यानाचा राजीव गांधी प्राणी संग्रहालय व वन्य प्राणी संशोधन केंद्रात समावेश केला गेला जे की पुणे महानगरपालिकेतर्फे व्यवस्थापित केले जाते. सापासारख्या प्राणघातक समजल्या जाणाऱ्या प्राण्यांबद्दल लोकांमध्ये जागृती निर्माण करून सापाबद्दल त्यांच्या मनात असलेली अज्ञात भीती काढून टाकून त्यांचे प्रबोधन करण्यासाठी ही संस्था अनेक कार्यक्रम आयोजित करते.

सुरुवातीला फक्त सरपटणारे प्राणी, सांबर, स्पॉटेड हरण आणि माकडे यांचा समावेश होता. शेवटी पेशवे पार्कमधील संपूर्ण प्राणी कात्रज येथे प्राणीसंग्रहालयात २००५ मध्ये आणण्यात आले आणि मग पेशवे पार्क बंद करण्यात आले. उद्यानात जखमी आणि अनाथ प्राण्यांसाठी बचाव केंद्र देखील समाविष्ट आहे. ऑक्टोबर २०१० पासून सदरील केंद्र प्राणी दत्तक योजना चालवित आहे.

प्राणीसंग्रहालयात सरपटणारे प्राणी, सस्तन प्राणी आणि पक्ष्यांचे संग्रह आहेत. सस्तन प्राण्यांमध्ये, प्राणीसंग्रहालयात पांढरा वाघ आणि बंगाली वाघ आहे. प्राणीसंग्रहालयातील इतर सस्तन प्राण्यांमध्ये बिबट्या, अस्वल, सांबर, हरण, काळवीट, माकडे आणि हत्ती यांचा समावेश आहे. सरपटणाऱ्या प्राण्यांमध्ये भारतीय रॉक पायथन, कोब्रा, साप, भारतीय मगर

Scanned with CamScanner



सह्याद्री पूर्व डोंगररांग.



राजीव गांधी प्राणी संग्रहालयाची पाहणी करताना प्राध्यापक आणि विद्यार्थी.



इस्कोन टेंपल(राधा-कृष्ण मंदिर), कात्रज.

Scanned with CamScanner

आणि भारतीय स्टार कासव यांचा समावेश आहे आणि मोरांसारखे पक्षी देखील एक वैशिष्ट्य आहे.

स्नेक पार्कमध्ये साप, सरपटणारे प्राणी, पक्षी आणि कासवांचा मोठा संग्रह आहे. सापांच्या २२ पेक्षा जास्त प्रजाती आहेत. यामध्ये १३ फूट लांब किंग कोब्राचा समावेश आहे. सापांविषयीची माहिती ब्रेलमध्येही दिली आहे. स्नेक पार्कने सापांविषयीची शंका दूर करण्यासाठी आणि सापांविषयीची भीती नष्ट करण्यासाठी अनेक सर्प महोत्सव आणि साप जागृती कार्यक्रम आयोजित केले जातात. नाग पंचमी दरम्यान, जनजागृती करण्यासाठी उद्यान कार्यक्रमांची व्यवस्था करते. एप्रिल २०१७ मध्ये प्राणिसंग्रहालयाने अशियायी सिंहाच्या एका जोडीचा समावेश होता, त्यानंतर प्राणिसंग्रहालयाच्या भेटींमध्ये लक्षणीय वाढ झाली.

4] इस्कॉन मंदिर (राधा-कृष्ण मंदिर):-

इस्कॉन मंदिर हे पुण्यातील कोंढवा येथील राधा-कृष्णाचे एक हिंदू मंदिर आहे. हे २०१३ मध्ये उघडण्यात आले. हे पुण्यातील सर्वात मोठे मंदिर आहे. मंदिरात मुख्य राधा कृष्ण मंदिर आणि व्यंकटेश्वर (बालाजी) मंदिर आहे. राधाकृष्ण मंदिर उत्तर भारतीय आर्किटेक्चर शैलीमध्ये लाल दगड आणि संगमरवरी वस्तूंनी बांधले गेले आहे, तर वेंकटेश्वर मंदिर दक्षिण भारतीय आर्किटेक्चर शैलीमध्ये कोटा दगड वापरून तयार केले गेले आहे. हे मंदिर ६ एकरांवर बांधले गेले असून त्यासाठी सात वर्षांचा कालावधी लागला. शिबिरात आणि भक्तांना इस्कॉन मंदिराच्या निधीतून मंदिर बांधण्यासाठी ४० कोटी रुपये लागले. २०१३ मध्ये राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्या हस्ते या मंदिराचे उद्घाटन झाले.

Scanned with CamScanner